मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# गणरायांच्या आगमनाला खड्ड्यांच संकट

## डागडुजीच्या रस्त्यांवरुन गणरायाचे होणार आगमन शहरातील स्थिती : डांबरीकरणाऐवजी महापालिका खड्डे बुजवणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

लाडक्या गणरायाचे आगमन शनिवारी (ता. ७) होत आहे. मात्र, शहरातील बहुतांश रस्त्यांवर अद्यापही खड्डे कायम आहेत. डांबरीकरणाऐवजी खडी, मुरूम, माती, पेव्हिंग ब्लॉक, कोल्डमिस्क, कॉंक्रिटच्या साहाय्याने खड्डे बुजवून रस्त्यांची डागडुजी सुरू आहे. पावसामुळे डांबरीकरणास अडथळे येत असल्याने गणरायाचे आगमन डागडुजी केलेल्या रस्त्यांवरूनच होईल, अशी सद्यःस्थिती आहे. जलवाहिन्या, सांडपाणी वाहिन्या टाकण्यासाठी महापालिकेने अनेक रस्ते खोदले होते. समाविष्ट गावांमध्ये आजही ही कामे सुरू आहेत. शिवाय, खासगी व्यक्तींनीही अनेक ठिकाणी रस्ते खोदले आहेत. त्यात आडवे चर अधिक आहेत. शिवाय, शहरातील बीआरटीएस मार्गावरील बसथांबे आणि स्मार्ट सीटी अंतर्गत बसथांब्यांवर लावलेल्या जाहिरात फलकांना वीजपुरवठा करण्यासाठीही रस्त्यांवर आडवे चर खोदून वीज वाहिन्या टाकल्या आहेत. मात्र, अनेक ठिकाणचे चर व्यवस्थित बुजवलेले नाहीत. खोदकामांच्या ठिकाणी पक्के डांबरीकरण केलेले नव्हते. त्यात गेल्या दोन महिन्यांपासून सतत पाऊस सुरू आहे. त्यामुळे जवळपास सर्वच रस्त्यांवर खड्डे पडले आहेत. पावसामुळे रस्त्यांचे डांबरीकरण करणे अशक्य आहे. परिणामी, केवळ खड्डे बुजवण्यावर महापालिकेने भर दिला आहे. त्यात आता गणेशोत्सव अवघ्या दोन दिवसांवर आला आहे. श्रीगणेश मूर्ती प्रतिष्ठापनेपूर्वी आणि विसर्जनानिमित्त गणेश मंडळाच्या मिरवणुका काढतात. त्यासाठी वेगवेगळे देखावे सादर केले जातात. त्या मिरवणुकीतील वाहनांसाठी रस्त्यांची दुरुस्ती आवश्यक आहे. मात्र, डांबरीकरण न झाल्याने महापालिकेने केवळ खड्डे बुजवण्यावर भर दिला आहे.



### महत्त्वाचे मिरवणूक मार्ग

» गणेशोत्सवात शहरातील महत्त्वाच्या मिरवणुका पिंपरी, चिंचवड, भोसरी, सांगवी, वाकड, दापोडी, थेरगाव, आकुर्डी-निगडी प्राधिकरण भागात असतात. दापोडी, सांगवीतील मंडळे मुळा व पवना नदीमध्ये मूर्ती विसर्जन करतात. पिंपरी परिसरातील मिरवणुका कॅम्पातील संत तुकाराम महाराज चौकात (जुना कराची चौक) आणि चिंचवड परिसरातील मिरवणुका चापेकर चौकात एकत्र येतात. तेथून पिंपरीतील सुभाषनगर घाट, पिंपरीगाव घाट, चिंचवडमधील मोरया घाटावर विसर्जन करतात. प्राधिकरणातील मंडळे गणेश तलाव, भोसरीतील मंडळे इंद्रायणी नदी किंवा विहिरीत मूर्ती विसर्जन करतात. त्यामुळे या परिसरातील रस्त्यांची दुरुस्ती आवश्यक आहे.

“गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरातील काही रस्त्यांची पाहणी केली. पावसामुळे डांबरीकरण शक्य नाही. मात्र, श्रीगणेश मिरवणूक मार्गांवरील खड्डे तातडीने भरण्याची सूचना संबंधितांना केली आहे. खड्डे बुजवल्याचा दैनंदिन अहवालही त्यांच्याकडून घेतला जात आहे.

- मकरंद निकम, शहर अभियंता, महापालिका.

# भोसरी, मोशी, चिखलीतील विसर्जन ठिकाणांची अति. आयुक्तांकडून पाहणी

## कृत्रिम विसर्जन हौदांची तातडीने स्वच्छता आणि डागडुजी करणे, आवश्यक ठिकाणी सीसीटीव्ही यंत्रणा उभारणे अशा सुचना अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी दिल्या.

**पिंपरी | प्रतिनिधी**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मिरवणूक मार्गातील रस्ते व्यवस्थित करणे तसेच विसर्जनासाठी पुरेसे कर्मचारी आणि यंत्रणा कार्यान्वित ठेवणे आणि सर्व घाटांवर निर्माल्य कुंडाची व्यवस्था करणे, कृत्रिम विसर्जन हौदांची तातडीने स्वच्छता आणि डागडुजी करणे, आवश्यक ठिकाणी सीसीटीव्ही यंत्रणा उभारणे अशा सुचना महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी अधिका-यांना दिल्या. आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त जांभळे यांनी आज भोसरी, आळंदी रस्ता, मोशी,चिखली येथील रस्त्यांची तसेच गावजत्रा मैदान, मोशी घाट आणि मोशी खाणीजवळील विसर्जन ठिकाणांची पाहणी केली आणि पाटील वतीने पुरविण्यात येणा-या सोईसुविधांबाबत आढावा घेतला त्यावेळी ते बोलत होते. या पाहणी दौऱ्यादरम्यान त्यांचेसमवेत शहर अभियंता मकरंद निकम,उप आयुक्त मनोज लोणकर,अण्णा बोदडे, मुख्य सुरक्षा अधिकारी मेजर उदय जरांडे, मुख्य आपत्ती व्यवस्थापन अधिकारी ओमप्रकाश बहिवाल, कार्यकारी अभियंता देवण्णा गट्टुवार, शिवराज वाडकर, उप अभियंता नरेश जाधव, सुशीलकुमार लवटे, शैलेश चव्हाण, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक,प्रशासन अधिकारी नाना मोरे तसेच विविध विभागातील कर्मचारी उपस्थित होते. याभेटी दरम्यान श्रीगणेशाची मिरवणूक तसेच विसर्जन मार्गावरील रस्त्यांची तातडीने दुरूस्ती करणे, शहरातील विसर्जन घाटांवरील निर्माल्यकुंडांची ठिकाणे निश्चित करून त्याठिकाणी फलक लावावेत, विसर्जना दरम्यान जीवरक्षकांची नेमणूक करावी, अत्यावश्यक ठिकाणी ॲम्ब्युलन्स व्यवस्था करणे, अग्निशमन तसेच आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा कार्यान्वित ठेवावी, नागरिकांसाठी पिण्याच्या पाण्याची सोय करावी, विसर्जन घाटांवर विद्युत विषयक कामे करणे अशा सूचना संबंधित अधिका-यांना दिल्या.



# खासगी शाळांची दुकानदारी होणार बंद

## शाळांवर नियंत्रण आणण्यासाठी स्वतंत्र कायदा, शिक्षण विभागाकडून विस्तृत आराखडा तयार

**पुणे | प्रतिनिधी**

गेल्या काही वर्षांत इंग्रजी शिक्षणाच्या नावाखाली केवळ नफेखोरीच्या उद्देशाने राज्यातील ग्रामीण, आदिवासी, निमशहरी भागात खासगी, विनाअनुदानित शाळांच्या संख्यांचे प्रमाण वाढले आहे. राज्यात सध्या ९००२ खासगी शाळा आहेत. त्यांच्यावर राज्यसरकारचे नियंत्रण ठेवण्यासाठी स्वतंत्र कायदा तयार करण्यात आला आहे.

दहा बाय दहाचे गाळे, कांद्याच्या चाळी, पत्र्याच्या शेडमध्ये विद्यार्थ्यांना आवश्यक असणाऱ्या कोणत्याही परिपूर्ण सुविधा नसलेल्या इंटरनॅशनल, पब्लिक आणि ग्लोबल स्कूल अवतरल्याने सरकारी शाळांच्या पटसंख्येवर विपरीत परिणाम होत असल्याचे चित्र सर्वत्र पाहायला मिळत आहे.

खासगी शाळांची वारेमाप संख्या वाढल्यानंतर आता राज्यातील शाळांचा विस्तृत आराखडा तयार करण्याचा निर्णय शालेय शिक्षण विभागाने घेतला आहे. शासन निर्णयानुसार आगामी काळात राज्यात नव्या खासगी शाळा सुरू करण्यावर नियंत्रण येण्याची चिन्हे असून, या आराखड्यात प्रगत आणि मागास असे दोन विभाग करण्यात येणारआहेत. प्रगत भागात शाळा सुरू करण्यासाठीचे नियम कठोर, तर मागास भागात शाळा सुरू करण्यासाठीचे नियम शिथिल करण्याबाबत विचार करण्याची सूचना करण्यात आली आहे.

शालेय शिक्षण विभागाने याबाबतचा शासन निर्णय प्रसिद्ध केला. महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ आणि महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०20 अंतर्गत स्वयं अर्थसहाय्यित तत्त्वावर नवीन शाळा स्थापन करणे, विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्याची कार्यपद्धती निश्चित करण्यात आली आहे.

मात्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा समप्रमाणात विखुरलेल्या नाहीत. अशा ग्रामीण भागात कमी, तर शहरी भागात मोठ्या प्रमाणात शाळा आहेत. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत नवीन शाळा सुरू करणे, विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणे यासाठी शाळांचा सविस्तर आराखडा तयार करण्यात येणार आहे.




### अनधिकृत विद्यार्थ्यांची ऑनलाइन नोंदणी अधिकृत शाळांमध्ये

» कोणत्याही संस्थेला, व्यक्तीला शाळा सुरू करण्यासाठी इमारत, क्रीडांगण, मुला मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह, पुरेसा प्रशिक्षित शिक्षक वर्ग, भौतिक सुविधा आदी बाबींची पूर्तता करणे बंधनकारक आहे. त्यानंतर शिक्षण विभागाकडून संबंधित शाळेला 'यूडीआयएसई' क्रमांक दिला जातो. परंतु आजही राज्याच्या ग्रामीण, शहरी भागात शेकडो अनधिकृत शाळांमध्ये विद्यार्थ्यांचे ज्ञानार्जन सुरू आहे. अनधिकृत शाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची ऑनलाइन नोंदणी अन्य अधिकृत शाळांमध्ये करण्याची चलाखी संबंधित संस्थाचालक करतात. याबाबत शिक्षण विभागाची डोळेझाक होत असल्याचे पालकांचे म्हणणे आहे.'

> प्राथमिक स्वरुपात हा सविस्तर आराखडा तयार झाला असून राज्य सरकारकडे तत्वत: मंजुरीसाठी पाठवण्यात येणार आहे. आराखड्यातील तरतुदींनुसार विविध सलंग्न कायद्यात दुरूस्ती करण्यासाठी तो विधी विभागाकडेही पाठवला जाईल. त्यानंतर आराखड्याला अंतिम स्वरुप दिले जाईल.
>
> **- सूरज मांढरे, शिक्षण आयुक्त.**

> 'यापूर्वी १९90 मध्ये शाळांचा सविस्तर आराखडा तयार झाला होता. त्यानंतर तब्बल २४ वर्षांनी नवीन असा आराखडा करण्याचा निर्णय झाला आहे. दहा वर्षांच्या कालखंडात शिक्षण क्षेत्रात अनेक स्थित्यंतरे होत असतात. त्याचा शिक्षण विभागाने जनगणनेच्या धर्तीवर दर दहा वर्षात आराखडा निश्चित करावा.
>
> **- संजय शेवाळे, प्राथमिक शिक्षक संघ.**

> विद्यार्थ्यांना भौतिक सुविधा नसलेल्या शाळा शासनाने तातडीने बंद कराव्या. शिक्षण क्षेत्रातील भ्रष्टाचार हद्दपार होणे गरजेचे आहे. सद्य:स्थितीत राज्यात गरजेपेक्षा जास्तच शाळा असल्याचे आकडेवारीवरून दिसते. तसेच खासगी शाळाही बंद पडत असल्याचे चित्र आहे.
>
> **- आनंद रणधिर, अध्यक्ष सम्यक फाऊंडेशन महाराष्ट्र राज्य.**

# हजारे उद्यानातील फुलराणी 'कोमेजली'; समस्यांच्या विळख्यात अडकले उद्यान

## पालिकेचे आनंद पार्क परिसरातील स्वातंत्र्यसैनिक अण्णा हजारे उद्यानातील फुलराणी धूळखात पडून असून ती डब्यात गेली असल्याचे स्पष्ट झाले आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**


वडगाव शेरी भागातील पालिकेचे आनंद पार्क परिसरातील स्वातंत्र्यसैनिक अण्णा हजारे उद्यान समस्यांच्या विळख्यात अडकले आहे. उद्यानातील फुलराणी धूळखात पडून असून ती डब्यात गेली असल्याचे स्पष्ट झाले आहे.

सध्या शहरात वाढत्या सिमेंटच्या जंगलामुळे सर्वसामान्य नागरिकांचा कोंडमारा झाला आहे.त्यामुळे यातून नागरिकांची सुटका व्हावी, या उद्देशाने पालिकेच्या उद्यान विभागाच्या वतीने शहरातील विविध भागात कोट्यवधी रुपये खर्च करून उद्याने उभारण्यात आली आहे. मात्र उद्यान अधिकाऱ्यांच्या मनमानी कारभारामुळे अनेक उद्याने ही शेवटची घटका मोजत आहेत. यापैकीच एक उद्यान म्हणजे वडगाव शेरी भागातील समाजसेवक पद्मभूषण डॉ. अण्णा हजारे उद्यान.

या मतदारसंघाकडे पूर्व हवेली भागाचे प्रवेशद्वार म्हणून पाहिले जाते. ३० वर्षांपूर्वीच्या येरवडा येथील इंद्रप्रस्थ उद्यानानंतर आनंद पार्क परिसरात नागरिकांच्या सोयीसाठी एक उद्यान उभारून त्याचे नामकरण समाजसेवक पद्मभूषण डॉ. अण्णा हजारे असे करण्यात आले. यापूर्वी बालचमूंना खेळाचा चांगल्या प्रकारे आनंद लुटता यावा यासाठी फुलराणी ठेवण्यात आली. त्यामुळे येथे येणाऱ्या लहान मुलांमध्ये नेहमीच फुलराणीत बसण्यासाठी चढाओढ असायची. त्यामुळे हे उद्यान नेहमीच लहान मुलांच्या किलबिलाटाने फुलून येत होते. मात्र सद्य परिस्थितीत हे वातावरण मावळले आहे. कारण येथील फुलराणी आता उद्यान विभाग अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणाचा बळी ठरली आहे. फुलरानीच्या टायर गंजले आहेत. ज्या फुलराणीत बसण्यासाठी चिमुकल्यांची गर्दी उसळत होती.ती आता शांतपणे एका जागेवर उभी आहे. एवढेच नव्हे तर तिच्या बैठक व्यवस्थेचीही दुरवस्था झाली आहे.

उद्यानातील फुलराणी बंद असल्याने बालकांनीही या उद्यानाकडे पाठ फिरवली आहे.याबरोबरच येथे लहान मुलांना खेळायला घेऊन येणारे आजी-आजोबा हे योगाचा सराव करत असतात. त्यांच्यासाठी उद्यानात स्वतंत्र पत्र्याचे शेड उभारण्यात आले आहे. पण त्यासही गळती लागल्याने पावसाचे पाणी हे पूर्णपणे पत्र्याच्या छिद्रातून सांडत असल्यामुळे याचा विनाकारण त्रास ज्येष्ठ नागरिकांना सहन करावा लागत आहे.

पालिकेच्या उद्यान विभाग अधिकाऱ्यांचे उद्यानातील देखभाल-दुरुस्तीच्या कामाकडे दुर्लक्ष झाले आहे. तसेच येथे येणाऱ्या नागरिकांसाठी पिण्याच्या पाण्यासाठी प्लास्टिक हौद ठेवण्यात आले आहेत. मात्र हे हौद पाण्याविना ठणठणीत कोरडे असून ते अस्ताव्यस्त अवस्थेत पडल्याचे पाहायला मिळत आहे.



> पालिका प्रशासन हे सर्वसामान्य नागरिकांच्या सुविधांबाबत उदासीन आहे. उद्यान विभाग अधिकाऱ्यांच्या मनमानीमुळे उद्यानाची अशी दुरवस्था होत असेल तर नागरिकांना या उद्यानाचा उपयोग काय?
>
> **- सतीश जाधव, स्थानिक नागरिक, वडगाव शेरी.**

# मालमत्ता ड्रोन सर्वेक्षणाचा निर्णय ठरला 'माईलस्टोन'

## शहरातील मालमत्तांचे 95 टक्के सर्वेक्षण पूर्ण : अडीच लाख नवीन मालमत्ता कर कक्षेत

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाच्या माध्यमातून अत्याधुनिक ड्रोनच्या सहाय्याने मालमत्ता सर्वेक्षण सुरू असून 95 टक्के सर्वेक्षण पुर्ण झाले आहे. या सर्व मालमत्तांना युपीक आयडी क्रमांक टाकून झाले आहेत. 148 पैकी फक्त 8 गटातील काम बाकी आहे. आत्तापर्यंतच्या सर्वेक्षणात तब्बल 2 लाख 54 हजार नवीन मालमत्ता आढळल्या आहेत. सध्याच्या आणि सर्वेक्षणात आढळलेल्या नवीन अशा सुमारे पावणेनऊ लाख मालमत्ता नोंदणीकृत होणार आहेत. यातून महापालिकेला मोठ्या प्रमाणात महसूल मिळणार आहे. त्यामुळे मालमत्ता सर्वेक्षणाचा आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह आणि अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली घेतलेला निर्णय हा महापालिकेच्या इतिहासात 'माईलस्टोन' ठरला आहे.



शहरात कर आकारणी व कर संकलन विभागाचे 18 झोन आहेत. यामध्ये 148 गटापैकी 140 गटातील 8 लाख 47 हजार 487 मालमत्तांना नंबर टाकून पूर्ण झाले आहेत. 8 गटातील मालमत्तांना नंबर टाकण्याचे काम प्रगतीपथावर आहे. सध्यस्थितीत 6 लाख 35 हजार नोंदणीकृत मालमत्ता आहेत. त्यापैकी 5 लाख 77 हजार 784 मालमत्तांचे जिओ सिक्वेसिंग झाले आहे. जुन्या आणि नवीन अशा 60 हजार मालमत्तांना नंबर टाकणे बाकी आहे. नोंदणीकृत नसलेल्या मात्र नंबर टाकून झालेल्या 2 लाख 54 हजार मालमत्ता आहेत. त्यामुळे शहरात सध्यस्थितीत 8 लाख 47 हजार 487 मालमत्ता होत आहेत. नंबर टाकून झालेल्या मालमत्तांपैकी 5 लाख 3 हजार 41 मालमत्तांचे अंतर्गत मोजमाप झाले आहे.

### कर आकारणीचे तीन टप्पे

मालमत्ता सर्वेक्षणासाठी स्थापत्य कन्सलटंट प्रा. लि. या एजन्सीची नियुक्ती केली आहे. या कंपनीमार्फत शहरात अत्याधुनिक ड्रोनच्या सहाय्याने नवीन, वाढीव, वापरात बदल अशा पध्दतीने मालमत्तांचे सर्वेक्षण सुरू आहे. यामध्ये आढळलेल्या मालमत्तांची कर आकारणी तीन टप्प्यात केली जाणार आहे. पहिल्या टप्प्यात नव्याने सापडलेल्या मालमत्तांना कर कक्षेत आणण्यात येत आहे. वापरात बदल आणि वाढीव बांधकामांची कर आकारणी दुस-या टप्प्यात होणार आहे. तिस-या टप्प्यात यापूर्वीच कर आकारणी झालेल्या मालमत्तांमध्ये फक्त अपडेशन होणार आहे. यामध्ये कोणतीही करवाढ होणार नाही. 6 लाख 35 हजार मालमत्ताधारकांपैकी ज्यांचा वापरात कोणताही बदल झालेला नाही, त्याची फक्त माहिती अद्यावत केली जाणार आहे. त्यांना कोणतीही नोटीस दिली जाणार नाही.

57 हजार मालमत्तांना कर वसुलीची प्रथम नोटीस अन् महापालिकेला मिळणार 140 कोटी

महापालिकेच्या वतीने करण्यात येणा-या सर्वेक्षणात आत्तापर्यंत 2 लाख 54 हजार नवीन मालमत्ता सापडल्या आहेत. यामधील सुमारे 57 हजार मालमत्ता धारकांच्या हरकती, सुचना, तक्रारीची सुनावणी प्रक्रिया चालू झाली आहे. त्यामुळे अशा मालमत्ता धारकांना कर आकारणी संदर्भातील पहिली नोटीस देण्यात येत असून त्याचे वाटप सुरू आहे. या मालमत्ता धारकांकडे चालू मागणी 55 कोटी तर थकीत मागणी 85 कोटी अशी 140 कोटींचा कराची रक्कम येणार आहे.

### नोटीस मिळताच 3 कोटी महापालिका तिजोरीत

नव्याने आढळलेल्या मालमत्तांपैकी प्रत्यक्षात बील तयार झालेल्या मालमत्तांची संख्या 14 हजार 500 आहे. या मालमत्ता धारकांकडे एकूण 30 कोटी 84 लाख रुपये येणे अपेक्षित आहे. त्यापैकी 3 कोटी रूपयांचा स्कॅनकोडच्या आधारे महापालिका तिजोरीत भरणा झाला आहे.

### सात ठिकाणी सुनावणी

नव्याने आढळलेल्या, वाढीव बांधकाम आणि वापरात बदल अशा मालमत्ता धारकांसाठी शहरातील महत्वाच्या सात ठिकाणी सुनावणी केंद्र सुरू करण्यात आली आहेत. क्षेत्रफळात फरक, वापरात बदल अशा करपात्र मुल्यावर परिणाम करणा-या ज्या बाबी आहेत. त्यासाठी सविस्तर सुनावणी घेण्यात येत आहे. तसेच या केंद्रात नागरिकांच्या इंडेक्स टू, नावात दुरूस्ती, मोबाईल क्रमांक, ई-मेल आयडी अपडेट करणे या सारख्या सर्व बाबींचा तत्काळ निपटारा होत आहे. सुनावणीसाठी पुन्हा-पुन्हा हेलपाटे मारण्याची गरज नाही.

### 8 गटात सर्वेक्षण प्रगतीपथावर

» शहरात कर आकारणी व कर संकलन विभागाने 148 गट तयार केले आहेत. यापैकी 140 गटातील मालमत्तांना क्रमांक देऊन झाले आहेत. मात्र, आठ गटात रेडझोन, झोपडपट्टीचा परिसर यासह विविध आव्हाने उभी राहिली आहेत. झोपडपट्टीधारकांना युपीक आयडीचे महत्व पटवून देण्यात येणार आहे. त्यांना भविष्यात कशा पध्दतीचा लाभ मिळेल, याची माहिती देण्यात येवून युपीक आयडी क्रमांक देण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

" महापालिका तंत्रज्ञानस्नेही करत असतानाच कर संकलन विभागात नवीन तंत्रज्ञानाचे अनेक प्रयोग राबवण्यात येत आहेत. डाटा विश्लेषण, त्यावर आधारित प्रसिद्धी, समाज माध्यमांचा अचूक वापर, प्रत्येक करदात्यापर्यंत पोचण्यात आम्हाला गेल्या दोन वर्षात यश आले. यातील पुढील सर्वाधिक महत्त्वाचा टप्पा हा उपग्रह छायाचित्र, ड्रोन सर्व्हे यांच्या माध्यमातून नवीन मालमत्तांचे सर्वंकष सर्वेक्षण हा होता. त्यातही आम्हाला यश येताना दिसत आहे. यात नागरिकांचीही आम्हाला सक्रिय साथ मिळत आहे, त्यामुळे आम्ही अल्पावधीत हा इतका व्यापक उपक्रम पूर्ण करू शकतो असा आम्हाला विश्वास आहे. नागरिकांवर कुठलीही करवाढ न लादता पालिकेचे उत्पन्न वाढवता येत आहे यात आम्हाला आनंद आहे.

- शेखर सिंह, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

# आयटीनगरी खंडित वीज पुरवठ्याने त्रस्त

## ग्रामपंचायतीने दिले महावितरणला पत्र : रोष व्यक्त करत दिला आंदोलनाचा इशारा

**पिंपरी | प्रतिनिधी**

आयटीनगरी मधील माणपरिसरातील विजेच्या समस्येबाबत ग्रामपंचायत आक्रमक झाली असून, विजेच्या समस्येबाबत ग्रामपंचायतने पत्रव्यवहार केला आहे. महावितरणच्या दुर्लक्षामुळे परिसरातील नागरिकांनी रोष व्यक्त केला आहे. यापूर्वीच या परिसरातील ग्रामस्थांनी रस्ते आणि ड्रेनेच्या तक्रारी केल्या होत्या. आता महावितरणच्या विरोधात ग्रामस्थ आक्रमक झालेले आहेत. समस्या न सुटल्यास आंदोलनचा इशारा देखील देण्यात आलेला आहे..

माणमधील गावठाण, वाड्या-वस्त्यांवर सध्या विजेच्या लपंडाव, कमी जास्त दाबाने होणारा विद्युत पुरवठा तसेच, जीर्ण झालेले खांब, झुकलेल्या विजेच्या तारा यामुळे ग्रामस्थ हैराण झाले आहेत. अनेकदा तक्रार करूनही यावर कोणती उपाययोजना होत नाही. महावितरणच्या गलथान कामकाजा बाबत माण हद्दीत सर्वत्र रोष व्यक्त केला जात असून, समस्या सोडवण्याची मागणी करण्यात आली आहे. अन्यथा शेकडो




ग्रामस्थांना घेऊन महावितरण कार्यालयावर आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला. दरम्यान, भेडसावत असलेल्या विविध समस्यां बाबत ग्रामपंचायत कडून अनेकदा भरे येथील कार्यालयात पत्रव्यवहार करण्यात आला आहे. मात्र, त्यास फारसा प्रतिसाद मिळत नसल्याने ग्रामपंचायतने आता आक्रमक भूमिका घेतली आहे.

ग्रामपंचायत हद्दीत विविध ठिकाणी जादा क्षमतेचे नविन ट्रान्सफार्मर बसवणे आवश्यक आहे.

### विद्युतवाहक तारा जीर्ण

» सध्या कार्यान्वयीत असलेल्या ट्रान्सफार्मरवर ताण येऊन वारंवार जंप जळणे, लाईन तुटणे, पॅनल बॉक्समधील लग्ज जळणे, ट्रान्सफार्मर नादुरुस्त होणे, घरगुती उपकरणे जळणे अशा समस्या निर्माण होत आहेत. एलटी लाईन केबल नागरी वस्तीजवळ धोकादायक परिस्थितीत आहे. चार दशकांपूर्वी बसवलेल्या विद्युत वाहक तारा कमकुवत झाल्याने अनेकवेळा विज पुरवठा खंडीत होतो. त्यापूर्वी करण्यात आलेल्या नियोजनानंतर हा परिसर वाढला आहे. लोकवस्ती, सोसायट्यादेखील वाढल्या आहेत.

# पुण्यात डेंग्यूसोबत चिकुनगुन्याचा 'ताप'! रुग्णसंख्येत दुपटीने वाढ

## एकाच वेळी डेंग्यू आणि चिकुनगुन्याचे रुग्ण वाढू लागल्याने आरोग्ययंत्रणांची चिंता वाढली

**पुणे | प्रतिनिधी**

शहरात डासांपासून पसरणाऱ्या आजारांचा प्रादुर्भाव वाढू लागला आहे. गेल्या महिन्यात डेंग्यूचे दररोज सरासरी ३८ रुग्ण आढळले असून, एकूण १ हजार १५० संशयित रुग्ण आढळून आले आहेत. याचबरोबर चिकुनगुन्याचे ऑगस्टमध्ये ५२ रुग्ण आढळले आहे. एकाच वेळी डेंग्यू आणि चिकुनगुन्याचे रुग्ण वाढू लागल्याने आरोग्ययंत्रणांची चिंता वाढली आहे. यामुळे डास प्रतिबंधक उपाययोजनांवर भर दिला जात आहे.



शहरात ऑगस्टमध्ये डेंग्यूचे एकूण १ हजार १५० संशयित रुग्ण आढळले असून, डेंग्यूचे निदान झालेले ८२ रुग्ण आहेत. शहरात डेंग्यूचे या वर्षात फेब्रुवारीमध्ये ५, मार्च ३, एप्रिल २ आणि जुलैमध्ये ३४ रुग्णांचे निदान झाले. जुलैच्या तुलनेत ऑगस्टमध्ये रुग्णसंख्या दुपटीहून अधिक वाढली आहे. याचबरोबर जुलैमध्ये ६३६ संशयित रुग्ण आढळले होते, तर ऑगस्टमध्ये १ हजार १५० संशयित रुग्ण आढळले आहेत. डेंग्यूची लक्षणे ही इतर विषाणुजन्य तापाच्या लक्षणांसारखीच असतात. अचानक चढणारा ताप, डोकेदुखी, अंगदुखी, सांधेदुखी व डोळ्यांच्या मागे दुखणे ही लक्षणे दिसून येतात. त्यासोबत डोकेदुखी, भूक मंदावणे, मळमळणे व पोटदुखी ही लक्षणे असतात.

चिकुनगुन्याचा संसर्गही वाढू लागला असून, या महिन्यात एकूण ५२ रुग्ण आढळले आहेत. ही रुग्णसंख्या जूनमध्ये १ आणि जुलैमध्ये २४ होती. गेल्या महिन्यात चिकुनगुन्याच्या रुग्णसंख्येत दुपटीने वाढ झाली आहे. या आजाराची लक्षणे साधारणतः दूषित डास चावल्यावर ३ ते ७ दिवसांनंतर दिसून येतात. या आजाराचा अधिशयन काळ ४ ते ७ दिवस आहे. या आजारात ताप, हुडहुडी भरणे, डोके दुखणे, मळमळ होणे, ओकारी होणे, तीव्र सांधेदुखी, अंगावर पुरळ अशी लक्षणे दिसून येतात. या आजारात कंबरेतून वाकलेला रुग्ण हे नेहमी आढळणारे लक्षण आहे. चिकुनगुन्या आजारातून बरे होताना पुष्कळदा नेहमी व सतत राहणारी सांधेदुखी आढळून येते.

**डासोत्पत्ती रोखण्यासाठी काय कराल...**

घरातील पाणी साठविण्याची सर्व भांडी आठवड्यातून एकदा रिकामी करा.

पाणी साठविण्याची सर्व भांडी योग्य पद्धतीने झाकून ठेवा.

घराच्या भोवतालचा परिसर स्वच्छ व कोरडा ठेवावा.

निरुपयोगी व टाकाऊ वस्तू घराच्या छतावर आणि परिसरात ठेवू नका.

शक्यतो पूर्ण अंग झाकेल असे कपडे वापरावेत.

**शहरातील ऑगस्टमधील रुग्णसंख्या**

- डेंग्यूचे संशयित रुग्ण – ११५०
- डेंग्यूचे निदान झालेले रुग्ण – ८२
- चिकुनगुन्याचे रुग्ण – ५२

"चिकुनगुन्या आजारावर विशिष्ट औषधोपचार उपलब्ध नाही. या आजारात रुग्णाच्या लक्षणांनुसार उपचार करावे लागतात. वेदनाशामक औषध घेतल्यास, तसेच भरपूर आराम केल्यास रुग्णाला फायद्याचे ठरते. आजारी व्यक्तीला डास चावू नये, याकरिता काळजी घ्यावी. जेणेकरून इतर व्यक्तींमध्ये आजाराचा प्रसार होणार नाही.

- डॉ. राजेश दिघे, सहायक आरोग्य अधिकारी, पुणे महापालिका.

# पीआरएन ब्लॉक विद्यार्थ्यांना पुनर्परीक्षेची संधी


## दिल्ली विद्यापीठानंतर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा निर्णय : तीस हजारांहून जास्त विद्यार्थ्यांचे नुकसान वाचले

**पुणे | प्रतिनिधी**

पर्मनंट रजिस्ट्रेशन नंबर (पीआरएन) ब्लॉक झालेल्या विद्यार्थ्यांना त्यांचे बॅकलॉग विषयांच्या परीक्षा देण्याची संधी मिळणार आहे. पुनर्परिक्षेची संधी देणारे देशात दिल्ली विद्यापीठानंतर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ हे दुसरे विद्यापीठ ठरले आहे. पुणे विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळ, व्यवस्थापन परिषदेसह शैक्षणिक परिषदेकडून हिरवा कंदील दाखविण्यात आला आहे. या निर्णयामुळे तब्बल तीस हजारांहून जास्त बॅचलर आणि मास्टर डिग्री विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टळणार आहे.

पुणे, नगर आणि नाशिक येथील संलग्न महाविद्यालयातील जवळपास ३० हजारहून जास्त विद्यार्थ्यांचे २०१७-१८ पासून बॅचलर, मास्टर डिग्री कोर्सेसमध्ये कोविडकाळात अडथळा निर्माण झाला होता. त्यानंतर शैक्षणिक कॅलेंडर कोलमडले. परिणामी लाखो विद्यार्थ्यांचे विषय बॅकलॉग राहिले. त्यानंतर पाच ते सहा वर्षांनंतर अखेर त्यांचे पीआरएन ब्लॉक झाल्यामुळे परिक्षा फॉर्म भरता येत नव्हते.

धक्कादायक बाब म्हणजे काही बॅचलर डिग्री कोर्सच्या विद्यार्थ्यांचे परिक्षा फॉर्म, परिक्षा फीदेखील स्वीकारली गेली. परंतु अचानक परीक्षा विभागाकडून ई मेलवर पीआरएन ब्लॉक करण्यात आल्याचे कळविण्यात आले. त्यामुळे हजारो विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य धोक्यात आले होते. यासंदर्भात तातडीने निर्णय घ्या, अन्यथा आंदोलन करू, अशी भूमिका काही विद्यार्थी संघटनांनी घेतली. विषयाचे गांभीर्य ओळखून पुणे विद्यापीठ प्रशासनाने सकारात्मक प्रतिसाद दिला. अखेर परिक्षा मंडळ, व्यवस्थापन परिषद आणि शैक्षणिक परिषदेकडून पुनर्परिक्षेला दुसऱ्यांदा संधी देण्याचा दिलासादायक निर्णय घेण्यात आला.



यासंदर्भात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषद सदस्य सागर वैद्य म्हणाले, गेले अनेक दिवस या संदर्भात विद्यापीठ प्रशासन, विद्यापीठ अनुदान आयोग (यूजीसी), राज्य केंद्रीय शिक्षण मंत्री स्तरावर पाठपुरावा सुरु आहे. यातूनच एक वर्ष दिलासा मिळाला. त्याचा फायदा सुमारे २५ हजार विद्यार्थ्यांना झाला आहे. पण त्यानंतरही अनेक विद्यार्थी वंचित होते. यावर मॅनेजमेंट कौन्सिलमध्ये सकारात्मक चर्चा झाली. नवीन शैक्षणिक धोरण (एनईपी) मध्ये प्रथम द्वितीय तृतीय वर्ष जरी पूर्ण झालेल असेल तर ड्रॉपआउट झालेल्या विद्यार्थ्यांनाही डिप्लोमा मिळतो. मग सर्व सेमिस्टरच्या एकूण ३०-४० पैकी केवळ एक-दोन विषयात अनुत्तीर्ण झाले म्हणून जुन्या विद्यार्थ्यांना विनापदवी ठेवून थेट नापासाचा शिक्का मारणे योग्य नाही. विमनस्क मन:स्थितीत असलेल्या अशा हजारो विद्यार्थ्यांना सहानुभूती ठेवून शेवटची संधी द्यावी. जेणेकरून त्यांचे भवितव्य वाचेल, यावर एकमत झाले. मॅनेजमेंट कौन्सिलने अशांना एक तरी संधी द्यावी यावर एकमताने होकार देवून निर्णय दिला आहे. आता अकॅडमिक कौन्सिलकडे हा प्रस्ताव दिला जाईल. तिथे यावर अंतिम निर्णय आणि स्वरूप निश्चिती होईल.

**गतवर्षीही दिली होती एक लाखावर विद्यार्थ्यांना संधी**

गतवर्षीदेखील पीआरएन ब्लॉक झालेल्या १ लाख १७ हजार विद्यार्थ्यांना पुनर्परिक्षेची संधी दिली होती. त्यापैकी उर्वरित विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भवितव्य धोक्यात येऊ नये, यासाठी जून महिन्यातील व्यवस्थापन परिषदेत या संदर्भात चर्चा झाली. त्यानंतर परीक्षा मंडळाकडून परिपत्रक काढून निर्णय जाहीर केला आहे. परंतु ही निर्णय घेण्यापूर्वी विद्यापीठ अनुदान आयोगाचे निर्देश घेणे. तसेच केंद्रीय शिक्षण मंत्रालयाकडून मंजुरी आवश्यक आहे. ती आम्ही घेत आहोत. आम्ही सकारात्मक निर्णय घेणार आहोत. ज्या विद्यार्थ्यांचे दोन सत्र म्हणजे एक वर्ष बॅकलॉग आहे, त्यांनादेखील पुनर्परीक्षा देता येईल का, याची चाचपणी केली जात आहे. भविष्यात डिग्रीबद्दल कोणी आक्षेप घेऊ नये, यासाठी विधी विभागाकडून सल्ला घेतला जात आहे. विद्यार्थ्यांची किती संख्या आहे, त्यानुसार परीक्षांचे वेळापत्रक तयार केले जाईल. एकाही विद्यार्थ्याचे शैक्षणिक नुकसान होणार नाही याची दक्षता घेतली जाईल, अशी ग्वाही सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र कुलगुरू डॉ. पराग काळकर यांनी दिली.